**रे. दि. मु. क्रमांक ८१/२०१४ मधील नि. क्र. ९१ खालील आदेश.**

**कुंडलिक भगवान वीर व रामचंद्र भगवान वीर**

**(आदेश पारित दिनांक १८.०६.२०२४)**

---

सदरचा अर्ज वादी यांनी वादीतर्फे निशाणी क्र. ५६ ला जे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे ते या वादीस Not Press करण्यास परवानगी मिळावी, अगर साक्षीदार हजर नसल्याने Evidence Decline करण्याकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादीनुसार, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी विरुद्ध वाटपासाठी दाखल केला आहे. याकामी वादीने निशाणी क्र. ५६ ला वादी नं. १ चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले, त्यानंतर दिनांक ११.०६.२०२१ रोजी उलटतपासासाठी तारीख पडली, परंतु प्रतिवादीतर्फे उलटतपास घेतला नाही, याउलट No cross चा हुकूम झाला आहे. दरम्यानच्या काळात वादी नं. १ कुंडलिक भगवान वीर यांची शारिरिक परिस्थिती बिघडली तसेच त्यांच्या आजारपणामुळे ते मे. कोर्टात हजर राहू शकत नाहीत, त्याबाबत वादीतर्फे मुखत्यारपत्र व डॉक्टरांचे MRI Report दाखल केलेले आहेत. वादी हे मे. कोर्टात हजर राहून जाबजबाब देणे अशक्य आहे, त्यामुळे वादीतर्फे मुखत्यार यांचा निशाणी क्र. ९० ला सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक १३/०२/२०२४ रोजी दाखल केले. प्रस्तूत कामी निशाणी क्र. ५६ ला जो साक्षीदार दिला होता, तो शारिरिक कारणामुळे त्यास दिसणे, ऐकू येणे कमी झालेने व तो कोर्टात हजर राहून जबाब देवू शकेल अशी शारिरिक परिस्थिती नाही, त्यामुळे वादीतर्फे निशाणी क्र. ५६ ला जे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे ते या वादीस Not Press करण्यास परवानगी मिळावी, अगर साक्षीदार हजर नसल्याने Evidence Decline करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

०३. सदर अर्जावर प्रतिवादी नं. २ यांनी आपले म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीनुसार, प्रस्तुतचे वादीचे निशाणी क्र. ९१ चे अर्जास विरोध केला आहे.

प्रस्तुतचे अर्जातील वादीचे कथन व मजकूर तसेच विनंती पाहता, वादीने निशाणी क्र. ५६ चे सरतपास प्रतिज्ञापत्राबाबत Evidence Decline करण्याची विनंती केली असून ती कायद्या बाहेरील आहे. वादीतर्फे निशाणी क्र. ५६ वर प्रतिज्ञापत्राने सरतपास दाखल करणारा इसम हा स्वतः वादीच आहे. वादीचा साक्षीदार हा शारिरिक दृष्टया असमर्थ (पुरावा देण्यास) असल्यास व याचा सरतपास मे. कोर्टासमोर येवून त्यानंतर त्यावर झालेला हुकूम पाहता, निशाणी क्र. ५६ Declined करण्याची विनंती वादींनी मे. कोर्टास करणे कायद्याचे दृष्टीने व न्यायाच्या हितासाठी योग्य व आवश्यक होते. परंतु तसे न करता वादी वेळ काढूपणा व नाहक कारण असून याची दखल मे. कोर्टाने घेवून वादीस मोठी कॉस्ट चा हुकूम होणे आवश्यक आहे, जेणेकरुन वादी मे. कोर्टाचा व कायद्याचा सम्मान राखण्यात कसूर करणार नाही व Prolong Tactise वापरणार नाही.

०४. सदर अर्जावर प्रतिवादी नं. १ यांनी आपले म्हणणे निशाणी क्र. ९२ वर दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. १ नुसार, वादी यांचा निशाणी क्र. ५६ चा पुरावा रद्दबातल न झाल्याने तो अद्यापही अस्तीत्त्वात आहे. दिनांक १२/१०/२०२१ रोजी निशाणी क्र. ६० वर नो क्रॉस चा आदेश हा सेट असाईड केला गेला. मुळ वादी क्र. २ मयत झाल्यानंतर त्यांच्या वारसांना दाव्यात सामील करुन घेतले. वादी यांनी अजय कुंडलिक वीर यांना निशाणी क्र. ८९ प्रमाणे मुखत्यार नेमले. वादीतर्फे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले, परंतु वादीचा आधीचा पुरावा हा रद्दबातल झालेला नाही. निशाणी क्र. ९१ प्रमाणे मुळ वादीचा सरतपास नोट प्रेस करावा असा अर्ज दिला परंतु त्यात सत्य परिस्थिती वादीने नमूद केलेली नाही. वैद्यकीय कागदपत्रे यावरुन पुरावा न देण्याचे कारण याचा बोध होत नाही. मुळ वादीने दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व साक्ष अर्धवट ठेवून कुलमुखत्यारद्वारे साक्ष वादीने देणे न्यायोचीत नाही, तशी कायद्यात तरतुद नाही. कुलमुखत्यारधारकास वादीतर्फे पुरावा देण्याची कायद्यात तरतुद नाही. मा.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णय AIR 2005, SC 439, जानकी वासुदेव भोजवानी वि. इंडसंट बँक लि., यात असे सांगण्यात आले आहे की, वादीतर्फे कुलमुखत्यार साक्ष देऊ शकत नाही, त्यामुळे वादीचा पुरावा रद्दबादल करुन दावा

खारीज करण्यात यावा.

०५. अर्ज व त्यावरील म्हणणे याचे अवलोकन केले. सदरचा अर्ज हा वादीतर्फे निशाणी क्र. ५६ ला जे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे ते या वादीस Not Press करण्यास परवानगी मिळावी, अगर साक्षीदार हजर नसल्याने Evidence Decline करण्याकरिता दाखल केलेला आहे. सदरचा निशाणी क्र. ५६ पाहता, वादी नामे कुंडलिक भगवान वीर यांनी दिनांक १६/१०/२०१८ रोजी पटलावर प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे दिसते. याच प्रतिज्ञापत्रावर वादीच्या विधीज्ञांमार्फत, "साक्षीदार यांना दिसायचे व ऐकू येण्याचे बंद झाले आहे, त्यामुळे कोर्टात हजर राहू शकत नाही, त्यामुळे नॉट प्रेस करायचे आहे" असे दिनांक १९/०३/२०२४ रोजी नमूद केल्याचे दिसते. वादीतर्फे, वादी २अ, वादी २ब व वादी क्र. ३ यांचेतर्फे लिहून घेणार म्हणून अजय कुंडलिक वीर यांचे नावावर विशेष मुखत्यारपत्र तयार करुन पटलावर दिनांक ३०/०१/२०२४ रोजी झेरॉक्स प्रत दाखल केल्याचे दिसते. परंतु, आजपर्यंत निशाणी क्र. ५६ वरील मूळ वादीचा पुरावा हा नॉट प्रेस करण्यात आलेला नाही.

०६. साक्षीदार क्र. १ वादी यांनाच त्यांचा पुरावा पटलावर द्यायचे नाही, नॉट प्रेस करावा असे त्यांचेच कथन असताना व त्याप्रमाणे सरतपासावर स्वतःहून नॉट प्रसे करावा असे लिहिलेली नोट पाहता, वादी क्र. १ यांचा पुरावा पटलावर वाचता येणार नाही, त्यामुळे वादी साक्षीदार क्र. १ यांना त्यांचा पुरावा फक्त दाखल करुन घेण्यात येतो.

०७. परंतु, पुन्हा वादी व इतर वादींतर्फे दाखल केलेले विशेष मुखत्यारपत्र पाहता, त्यामध्ये लिहून देणार म्हणून वादीचे नाव दिसते. एकीकडे वादी स्वतःचा पुरावा चालवायचा नाही, नॉट प्रेस करावा असे सांगतो व दुस–या बाजूला झेरॉक्स विशेष कुलमुखत्यारपत्र दाखल करुन स्वतःचा पुरावा पुन्हा पटलावर दाखल करण्याचा प्रयत्न करीत आहे. यावरुन वादी क्र. १ हे स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेला नाही असे

दिसते. परंतु, दाव्यातील वादी क्र. २ यांचा पुरावा देण्याचा अधिकार दाव्यात अबाधित आहे. त्यामुळे वादी क्र. २ यांना त्यांच्यापुरता पुरावा देता येईल. सदर प्रकरणात जरी विशेष कुलमुखत्यारपत्र दाखल केले तरी वादी क्र. २ यांना माहिती असलेल्या बाबींबाबतच ते पुरावा देऊ शकतील. उपरोक्त नमूद सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | निशाणी क्र. ५६ वरील वादी क्र. १ चा पुरावा दाखल करुन घेणेत येतो. |
| २. | वादी क्र. २ यांना पुरावा देण्याची संधी देण्यात येते. |
| ३. | खर्चाबाबत आदेश नाही. |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2024.06.18 17:53:31 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांकः– १८.०६.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे–

न्यायालयाचे नाव : सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खंडाळा.

लघुलेखकाचे नाव : सौ. सुवर्णा संकेत शिंदे.

Sd/–

(एस.एस.शिंदे)

लघुलेखक